डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा.क्र./बार्टी-पुणे / अधिछात्रवृत्ती/ २०१९-२०/ ६१८

दिनांक :०१/०२/२०२०

**प्रति,**

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

**BANRF वर्ष :**

**विषय:-बार्टी मधून मिळणाऱ्या अधिछात्रवृत्ती व्यतिरिक्त इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेत नसल्याचे तसेच खाजगी, शासकीय व इतर कोठेही पूर्ण/अर्ध वेळ नोकरीच्या/ व्यवसाय करून आर्थिक उत्पन्नाचा लाभ घेतलेला नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र(Affidavit) सादर करणेबाबत..**

**संदर्भ:-१) बार्टीच्या दिनांक २९/११/२०१९ रोजीच्या २५ व्या नियामक मंडळाच्या बैठकीतील निर्णय.**

**२) मा. महासंचालक यांनी दि. २१/०१/२०२० रोजी मान्य केलेली टिपणी क्रं.७५.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये बार्टीच्या दिनांक २९/११/२०१९ रोजीच्या २५ व्या नियामक मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार ज्या एम.फिल. व पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मिळते त्यांना सदर योजनेतून वगळावे, जेणेकरून व्दिरुक्ती होणार नाही. याशिवाय याआधी लाभ मिळालेले/ लाभ घेत असलेले विद्यार्थी यांनी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ घेतला किंवा कसे याची तपासणी करावी व ज्या विद्यार्थ्यांनी दुबार लाभ घेतलेला असल्यास त्यांना या योजनेतून मिळालेल्या रक्कमेची वसुली करावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

वरील प्रमाणे आपण एम.फिल./पीएच.डी. साठी नोंदणी दिनांकापासून खाजगी, शासकीय व इतर कोठेही पूर्ण/अर्ध वेळ नोकरीच्या स्वरुपात तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करून आर्थिक उत्पन्नाचा लाभ घेतलेला नाही किंवा अर्थाजन केलेले नाही तसेच कोणतीही भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती किंवा इतर

Scanned by CamScanner

कोणत्याही शिष्यवृत्तीचा/ अधिछात्रवृत्तीचा लाभ घेतलेला नाही/ घेत नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे बंधनकारक आहे.

सदर प्रतिज्ञापत्र (Affidavit) हे स्वतः च्या फोटोसहित संबंधित तहसिलच्या सेतू कार्यालयातून तयार करून घ्यावे. **सदर बाबींची पूर्तता करणेसाठी आपण सोबत जोडलेल्या नमुना प्रतिज्ञापत्र (Affidavit) दिनांक:१५/०२/२०२० पर्यंत बार्टी कार्यालयात सादर करावे अन्यथा आपली पुढील अधिछात्रवृत्ती रक्कम थांबविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीसत्व :

१. **विद्यापीठ :** सदर विद्यार्थी बार्टी अधिछात्रवृत्ती व्यतिरिक्त भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती/ इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/ विद्यापीठ वसतिगृह लाभ घेत असल्यास सदरची माहिती बार्टी कार्यालास कळवावे.

**मा. महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**निबंधक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

Scanned by CamScanner

फोटो

प्रतिज्ञापत्राचे स्वरूप खालील प्रमाणे आहे :

## प्रतिज्ञापत्र

मी, ........................................, वय ............ वर्षे, राहणार ................ (संपूर्ण पत्ता) .................. असून एम.फील/ पी.एचडी ............. (विद्यापीठाचे नाव) ................. या विद्यापीठात ......... (संशोधनाचा विषय) ...................... या विषयावर करत असून/ केले असून माझे एम.फील/ पी.एचडी चे मार्गदर्शक ......... (गाईड चे नाव) ............... हे आहेत/होते. माझी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत अधिछात्रवृत्तीसाठी (BANRF - 20.....) या वर्षाकरिता निवड करण्यात आली आहे/होती. **सदर एम.फिल. / पीएच.डी. साठी नोंदणी दिनांकापासून खाजगी, शासकीय व इतर कोठेही पूर्ण/अर्ध वेळ नोकरीच्या स्वरुपात तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करून आर्थिक उत्पन्नाचा लाभ घेतलेला नाही/घेत नाही किंवा अर्थाजन केलेले नाही/करत नाही. तसेच मी कोणतीही भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती किंवा इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नाही/घेत नाही**. वरील माहिती खोटी आढळल्यास मला मिळालेली अधिछात्रवृत्तीची पूर्ण रक्कम व्याजासहित बार्टीच्या नियमाप्रमाणे वसूल करण्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

वरील सर्व मजकूर माझ्या माहिती प्रमाणे सत्य व बरोबर असून सदरचा मजकूर खोटा व चुकीचा आढळून आल्यास मी, भारतीय दंड संहितेच्या कलम १९९ व २०० प्रमाणे होणाऱ्या शिक्षेस पात्र राहील. तरी, हे प्रतिज्ञापत्र दिनांक .../.../.... रोजी लिहून दिले असे.

**प्रतिज्ञापत्र करणार**

---

टीप: (खालील टीप फक्त माहितीसाठी असून प्रतिज्ञापत्र (Affidavit) मध्ये याचा उल्लेख करू नये.)

१. सदर प्रतिज्ञापत्र हे स्वतः च्या फोटोसहित संबंधित तहसिलच्या सेतू कार्यालयातून तयार करून घ्यावे .

२. अधिछात्रवृत्तीसाठी निवड झाल्यावर नोकरी केली असल्यास/ करत असल्यास त्याबाबतची सर्व माहिती व कागदपत्रे बार्टी कार्यालयात जमा करण्यात यावे. तसेच नोकरीचा कालावधी, वेतन प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद करण्यात यावे.

३. अधिछात्रवृत्तीसाठी निवड झाल्यावर इतर कोणत्याही भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती/ इतर कोणत्याही विद्यापीठाची शिष्यवृत्ती घेत असल्यास त्याबाबतची सर्व माहिती व कागदपत्रे बार्टी कार्यालयात जमा करण्यात यावे. तसेच सदरचा कालावधी, मानधन प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद करण्यात यावे.

Scanned by CamScanner